## ३.४ खत सहकारी संघ ( Fertilizer Cooperatives ):

प्रास्ताविक : आपण या प्रकरणामध्ये भारतीय शेतकरी खत सहकारी संघ व कृषक भारती सहकारी लिमिटेड या दोन सहकारी संस्थांचा अभ्यास करणार आहोत.

### ३.४.१ भारतीय शेतकरी खत सहकारी संघ (Indian Farmers Fertilizer Cooperatives ):

कृषी क्षेत्राच्या विकासामध्ये जमीन, पाणी, खते, जंतू नाशके इत्यादी आदाने महत्त्वपूर्ण मानली जातात. यांचा पुरेशा व वेळेवर पुरवठा झाल्यास कृषी उत्पादन वाढण्यास मदत होते. कृषी आदनामध्ये खत हा एक महत्त्वाचा घटक आहे. त्याचा पुरेशा पुरवठा करणेसाठी सरकारने अनेक प्रयत्न केले आहेत. त्यापैकी एक महत्त्वाचा प्रयत्न म्हणजे भारतीय शेतकरी खत सहकारी संघाची (इफको) स्थापना ३ नोहेंबर १९६७ मध्ये करण्यात आली. ही जगातील सर्वात मोठी खत सहकारी संस्था आहे. बहुराज्य सहकारी संस्था अधिनियम १९८४ आणि २००२ च्या अधिनियमानुसार एक बहुराज्य सहकारी सोसायटी आहे. इफकोच्या ४० हजार सहकारी संस्था सभासद आहेत. या संस्थेची स्थापना प्रामुख्याने खतांचे उत्पादन व विक्री करणेच्या मुख्य उद्देशाने करण्यात आलेली आहे.

१९६० पर्यंत देशात वापरल्या जाणाऱ्या सुमारे ७० टक्के खतांचे वितरण सहकारी क्षेत्रामार्फत केले जात होते. सहकारी क्षेत्राकडे खतांच्या विपणनासाठी पुरेशा पायाभूत सुविधा उपलब्ध होत्या.परंतु स्वत:चे उत्पादन करण्याचे युनिट नसल्यामुळे त्याला सार्वजनिक व खाजगी खत उत्पादनावर अवलंबून राहावे लागत होते. या समस्येवर मात करून मागणी व पुरवठ्यातील अंतर कमी करणेच्या उद्देशाने शेतकर्यांच्या गरजा पूर्ण करू शकणारी सहकारी संस्था स्थापन करणाच्या महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यामुळे देशातील सहकारी संस्थांनी त्यांच्या हिताचे रक्षण करणेसाठी इफको या शेतकरी सहकारी खत संस्थेची स्थापना करण्यात आली. इफकोच्या १९६७ मध्ये ५७ संस्था सदस्य होत्या त्यांची संख्या आता ३८,१५५ इतकी वाढली आहे.

इफको चे मुख्य ध्येय:

भारतीय शेतकरी खत सहकारी लिमिटेड (इफको) चे मुख्य ध्येय देशातील शेतकर्यांना विश्वनीय आणि उच्च दर्जाच्या शेती आदानाचा वेळेवर पुरवठा करणे,पर्यावरण पूरक कृषी सेवा पुरवणे, तसेच त्याच्या कल्याणासाठी फायदेशीर अशा इतर योजना राबवून त्यांचा विकास करणे हे आहे. हे ध्येय साध्य

करणेसाठी,इफको  सहकारी संस्था म्हणून आपली जबाबदारीपूर्ण करीत असताना तिच्या सभासद सहकारी संस्था व शेतकरी यांच्या कल्याणाशी संबधित अनेक योजना राबविते.

इफकोची उद्दीष्ट्ये:

१.शेती व ग्रामीण विकासासाठी अनुसांघिक आणि पूरक कामे करणे

२.भारतात आणि प्रदेशात शाखा आणि विक्री केंद्रे स्थापन करणे.

३.इफकोच्या व्यवसायाशी संबधित सर्व बाबतीत मध्यस्थ म्हणून काम करणे.

४.रासायनिक खते व त्यांच्याशी संबधित उत्पादने/उप-उत्पादने यांच्या निर्मितीसाठी एक किंवा त्यापेक्षा अधिक कारखाने सुरु करणे.

५.सहकारी संस्थांच्या कर्मचार्यांना शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या खते व इतर आवश्यक वस्तूंची विक्री वाढविण्यासाठीची व्यवस्था करणे व त्यासाठी त्यांना प्रशिक्षण देणे.

६.शेतीशी संबधित आधुनिक आणि अत्याधुनिक शेती तंत्र आणि मानव संसाधन विकासाशी संबधित इतर क्षेत्रामध्ये शेतकरी व इतर व्यक्तींना प्रशिक्षण देणेसाठी संस्था स्थापन करणे.

७.सहकारी संस्था व त्यांच्या संबधित व्यवस्थेसाठी गुदाम व्यवस्था करणे,बांधणे,भाड्याने घेणे.

८.सहकारी संस्था आणि इतर संस्थाना शेअर भांडवलाची व्यवस्था करणे.

९.कृषी उत्पादन वाढीसाठी रासायनिक अवजारे, उपकरणे, विपणन यांची आयात निर्यात करणे.

१०.खते आणि इतर वस्तूच्या साठवणुकीसाठी स्वत:किंवा इतर सहकारी संस्थाच्या मदतीने साठवणूक गुहाची स्थापना करणे.

११.रस्ते किंवा समुद्रमार्गे साहित्याच्या वाहतुकीसाठी स्वत:हून किंवा कोणत्याही भारतीय किंवा परदेशी एजन्सीच्या मदतीने वाहतूक सुविधांची व्यवस्था करणे.

१२.कृषी क्षेत्रातील संशोधन आणि विकासासाठी सरकारी संस्था आणि खाजगी संस्थाकडून भाडेतत्वावर जमीन खरेदी करून किंवा संपादन करून शेती फार्मची स्थापना करणे.

१३.सभासद संस्था आणि इतर संस्थाना तांत्रिक सल्ला आणि इतर सेवा प्रदान करणे.

१४.कृषी विकासासाठी खते व ग्रामीण विकासासाठी वापरल्या जाणाऱ्या आवश्यक वस्तूंचे उत्पादन आणि विपणन या क्षेत्रातील सहकारी संस्थाना प्रोत्साहन देणे.

१५.इफकोच्या व्यवसायासाठी जमीन,इमारती,फर्निचर,वाहने खरेदी-विक्री करणे,भाड्याने घेणे किंवा भाड्याने देणे.

१६.ग्रामीण व शहरी भागात जमीन-मालमत्ता खरेदी करणे आणि कर्मचारी व सभासदांसाठी सहकारी गृहनिर्माण व्यवस्था राबविणे.

१७.जैव तंत्र ज्ञानावर आधारित उद्योगाची स्थापना करणे.

१८.राष्ट्रीय महत्त्व किंवा विकासाची क्षमता असलेले उद्योग स्थापन करणे.

१९.उपकरणे,साधने,यंत्रे यांचे उत्पादन आणि विक्री करणे.

२०.इफको च्या उद्दिष्टाचा विस्तार करण्याच्या उद्देशाने सहाय्यक कंपन्याना प्रोत्साहन देणे.

**३.४.२.कृषक भारती सहकारी लिमेटेड (क्रिबको)**:

प्रास्ताविक :

क्रिबको हि भारत सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या आखत्यारीतील केंद्र सरकारची सहकारी संस्था आहे. क्रिबकोनो खाजगीकरण,उदारीकरण व जागतिकिकरण धोरणानंतरच्या अर्थव्यवस्थेतील आव्हानांना तोंड देणेसाठी अंतर्गत प्रक्रियेमध्ये सुधारणा केली आहे.या उपक्रमाचा एक भाग म्हणून क्रिबकोने परदेशांतील जोइंट व्हेन्चरमध्ये प्रवेश केला आहे.

कृषक भारती सहकारी लिमेटेड (क्रिबको) हि एक मल्टी स्टेट को. ऑपरेटिव्ह सोसायटी असून ती बहु-राज्य सहकारी सोसायटीज अंतर्गत नोंदणीकृत असल्याचे मानण्यात येते. क्रिबकोची स्थापना १७ एप्रिल १९८० रोजी राष्ट्रीय स्तरावरील मल्टी स्टेट को – ऑपरेटिव्ह सोसायटी म्हणून करण्यात आली आहे. क्रिबकोनो जागतिक अर्थव्यवस्थेतील आव्हानांना तोंड देण्यासाठी अंतर्गत कार्य प्रणालीमध्ये

फेरबदल केले आहेत. उपरोक्त उपक्रमाचा भाग म्हणून क्रिबकोने परदेशी –संयुक्त उपक्रमामध्ये प्रवेश केला आहे. उदा.वीज केंद्र. क्रिबको अनके वर्षापासून जैव तंत्र ज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देत आहे. कृषी उत्पादनात वाढ करणेसाठी गुणवत्तेच्या बियाणांचे महत्त्व लक्षात घेवून १९९०-९१ मध्ये कृषी उत्पादनाची गुणवत्ता प्रमाणित बियाणे देण्यासाठी कृषी बीज गुणक कार्यक्रम सुरु करण्यात आला. क्रिबको बी.टी.कॉटन सारख्या वविध पिकांचे उच्च उत्पन्न संकरित बियाणे बाजारात आणत आहे.कृषी आयात आणि इतर खते जसे की डीएपी,डीएपी-लाईटआणि एमओपीई वेळोवेळी बाजारपेठेत गुंतवणूक करतात. जागतिक स्तरावरील खत उत्पादक सहकारी संस्थेच्या कार्य क्षेत्रातील सर्व सामन्यामध्ये कर्ज वाढीचे श्रेय क्रिबको यांना देण्यात आले आहे क्रिबको हे क्रिबकोने सहकारी तत्वावर साध्य केले आहे आणि देशातील आधुनिक कृषी व सहकारी संस्थांच्या कार्याला प्रोत्साहन देणेसाठी सतत प्रयत्न केले आहेत. क्रिबकोची बांधिलकी,प्रामाणिकपणा हे उत्कृष्टतेचे उच्च मानदंड दर्शवित आहे.आपले साध्य करण्याच्या प्रयत्नाला कर्मचाऱ्यांचे समर्थन हे प्रेरणा देणारे आहे.हि आयएसओ ९००१ आणि आयएसओ,९००२ प्रमाणित संघटना आहे.

क्रिबको मिशन :

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आणि व्यवसायिक लाभदायक अशा दोन्ही प्रकल्पांना निवडून,वित्त पुरवठा करून आणि त्यांचे व्यवस्थापन करून कृषी आणि ग्रामीण विकासाच्या प्रेरक म्हणून काम करणे.

क्रिबको दृष्टीकोन :

शेतकरी समाजाचे प्रतिनिधित्व करणारी जागतिक पातळीवरील संघटना आणि इनपुट ग्रामीण गरजा वरील उत्पादने आणि इतर विविध व्यवसायामध्ये विशेष करून त्यांचे परतावा वाढविते जे भागधारकांचे म्युल्य वाढवितात.

क्रिबकोचे उद्दिष्ट्ये :

१.सहकारी यंत्रनेला बळकट करणेसाठी

२.युरिया स्थापित क्षमतेत सुधारणा करणे आणि त्याचा बाजारातील हिस्सा वाढविणे.

३.विद्यमान वनस्पती व यंत्र सामुग्रीचा अधिकतम उपयोग सुनिश्चित करणे.

४.आधुनिक शेतीसाठी तंत्रज्ञान बदलणे आणि शेतकरयाच्या जीवनामध्ये सुधारणा करणे.

५.शेतकर्यांना शिक्षित आणि प्रशिक्षित करण्यासाठी माती पोषक आणि सिंचन पाण्यासाठी विनामूल्य चाचणी सुविधा प्रदान करणे. क्रिबको:

शेतकर्यांना प्रभावी कृषी सेवांच्या माध्यमातून टिकाऊ शेती,सहकारी आणि ग्रामीण विकासासाठी कृषकांचा एक फोकस क्षेत्र आहे. सोसायटीने शेतकरी समुदायांना नवीनतम शेती तंत्रज्ञान हस्तांतरीत करण्याच्या दिशने आपले प्रयत्न चालू ठेवल आणि आजीविका सुधारण्यासाठी ग्रामीण कल्याण कार्यक्रमाचे आयोजन केले. क्रिबको सुरु झाल्यापासून शेतकरी सभा किसान मेल,क्षेत्रीय दिवस बयाणे,सेमिनार,गट चर्चा आणि सिएआर,मानव आरोग्य अभियान,पशु आरोग्य अभियान,स्वच्छता मोहीम,ग्रामीण अशा कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. क्रीडा आणि पेयजल सुविधा इत्यादी देशभरात १२६ लाख शेतकरी आणि सहकारी अधिकार्यांना फायदा झाला. क्रिबकोने शेतकरी ज्यांनी सहकारी संस्थाना विविध शेती तंत्रज्ञानावर ९.४५ लाख तांत्रिक फोल्डर्स उपलब्ध करून दिले आहेत.

कृभको फर्टिलायझर लिमिटेड हि क्रिबकोची उपकंपनी आहे क्रिबकोने गुजराथ स्टेट एनर्जी जनरेशन मध्ये गुंतवणूक करून कृषी व्यवसाय आणि हरित उर्जाक्षेत्रात विविधता आणली आहे. क्रिबको अनेक वर्षापासून जैव खतांच्या वापरास प्रोत्साहन देत आहे. हाजिरा (गुजराथ), वाराणशी (उत्तर प्रदेश),लांझा (महाराष्ट्र)येथे जैव-खते तयार करण्यासाठी सोसायटीची तीन युनिट्स आहेत. हि लिक्विड जैव खतांची विक्री करते जी विविध सुक्ष्म जंतूंचे एकत्रीकरण आहे.हि शेतीला पूरक व पोषक खतांची आयात आणि विक्री करते. जमिनीच्या घसरणीनिशी संबधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी संद्रीय शेती हा एक व्यवहारिक पर्याय उदयास आला आहे.कृभको नियमितपणे शहरातील कचऱ्यापासून बनवलेल्या कंपोस्ट मार्केटिंग करते.

==========================================